# प्रकरण सातवे

# उपसंहार

## उपसंहार

आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये भरीव व मोलाची कामगिरी करुन महाराष्ट्राचे भाग्य उजाळणारा, कृष्णा खो-याच्या कुशीत जन्माला आलेला हा महाराष्ट्राचा लोकनेता व कृष्णेचा सुपुत्र म्हणजे राजाराम अनंत पाटील होय. अशा या लोकनेत्याने कष्टाने परिश्रमाने स्वत:चे व्यक्तिमत्व घडवले.

राजारामबापू पाटील यांची घरची परिस्थिती बेताचीच होती. त्यांचे वडिल अनंत पाटील हे पंढरपूरच्या विठोबाचे भक्त असल्याने घरी देवपूजा नित्य-नियमाने होत असे. अशा धार्मिक व पवित्र वातावरणात ते वाढले. त्यांच्यावर लहानपणी धार्मिक संस्कार झाले, कासेगांवमध्ये शिक्षणाची सोय नसल्याने नेर्ले या गावी इयत्ता सातवी पास व्हावे लागले. त्यानंतर पुणे येथे घरची परिस्थिती कठीण असतानाही शिक्षणासाठी गेले. याकाळात राजारामबापूंना गरीब पण शिक्षणासाठी तळमळणा-या विद्यार्थ्यांच्या वाटयाला जी दु:खे येतात, हालअपेष्टा भोगावे लागतात त्या संपूर्ण यातना सहन करुन पुणे येथे मॅट्रिकची परीक्षा पास व्हावे लागले. त्यानंतर बडोदा याठिकाणी सयाजीराव गायकवाड यांच्या प्रेरणेमुळे ते इंटरपरीक्षा पास झाले. त्यानंतर कोल्हापूरला साईक्स लॉ कॉलेजमधून त्यांनी एलएल.बी.ची पदवी संपादन केली. शिक्षण घेत असताना त्यांनी कोल्हापूरच्या राजर्षि शाहू महाराजांचे सामाजिक समतेचे महान कार्य पाहिले होते. त्यांच्या कार्याचा वारसा जतन केला पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्याच बरोबर राजारामबापूंच्या धडपडीच्या शिक्षणकाळातच अखेरचा स्वातंत्र्यसंग्राम मोठा हिरीरीने चालू होता. संपूर्ण देश इंग्रजांच्याविरुध्द पेटून उठला होता अशा वेळी राजारामबापू पाटील यांचे तरुण रक्त कसे गप्प बसणार ?

वाळवा तालुका हा क्रांतीकारकांचा तालुका होता. कासेगांव, कुंडल व वाटेगांव ही स्वातंत्र्य लढयातील मुख्य केन्द्रेच होती. राजारामबापू पाटील यांचे विधायक कार्य त्यांच्या गावातच सुरु झाले. त्यांच्या घरची परिस्थिती सामान्य

शेतक-याप्रमाणे गरीबीची असल्याने आई-वडिल व चुलते यांच्या मोठया अपेक्षा होत्या. पण राजारामबापूंनी ` जग` हाच आपला संसार मानला होता. त्यामुळे त्यांनी स्वातंत्र्य आणि देशसेवेला वाहून घेतले.

राजारामबापूंना शिक्षणासाठी नेर्ले, पुणे, बडोदा व कोल्हापूर इत्यादि ठिकाणी जावे लागले होते. त्याच बरोबर सर्व सुधारणेचे मुळकेन्द्र शिक्षणात आहे हे ओळखून त्यांनी शिक्षण सेवेतून समाजसेवेला सुरुवात केली. त्यांनी सन १९४५ मध्ये कासेगांव येथे कासेगांव शिक्षण संस्थेची स्थापना केली व त्याद्वारे `आझाद विद्यालय` सुरु केले. व हळूहळू संबंध तालुका भर शाळांचे जाळे पसरविले. त्यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य पाहून सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष मा.श्री.बाळासाहेब देसाई यांनी राजारामबापूंना सातारा स्कूल बोर्डाचे चेअरमन केले. त्याठिकाणी त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला म्हणून पुढे त्यांची दक्षिण सातारा(सांगली) जिल्हाचे लोकल बोर्डाचे अध्यक्ष करण्यात आले(१९५२),

सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर (१९५२ - १९६२ ) त्यांनी शाळा, जोडरस्ते, पिण्याच्या सोईसंदर्भात विहिरी व आड खोदले, ग्रामपंचायतीची कार्यालये, सार्वजनिक आरोग्य व दवाखाने, धर्मशाळा, दळणवळणाच्या सोई, नदीकाठावरील गावाच्यासाठी नावा इत्यादि अनेक महत्वपूर्ण कार्य केल्या-मुळेच सन १९५९ मध्ये द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री मा.यशवंतराव चव्हाण यांनी मा.बापूंना महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष केले. याकाळात त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात पक्ष संघटना बांधणीचे कार्य केले.

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून कार्य करीत असताना त्यांनी सांगली येथील शेतकरी सहकारी साखर कारखाना उभारणीत सहभाग घेतला. त्याच बरोबर शिवाजी विद्यापीठ स्थापना समितीचे सदस्य व सिनेटर म्हणूनही महत्वाची कामगिरी पार पाडली. सांगली लोकल बोर्ड व महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष असल्याने त्यांचा संपर्क संबंध महाराष्ट्रभर पसरलेला होता, त्यांनी याकाळात कॉंग्रेस पक्षाची पुर्नबांधणी करुन कॉंग्रेसची शक्ती वाढविली, त्यामुळे याची दखल मा.मुख्यमंत्री कै.श्री.यशवंतराव चव्हाण यांनी घेऊन मा.राजाराम-

करण्यासाठी प्रोत्साहन दिले. महाराष्ट्र शासनातर्फे विदर्भ आणि कोंकण विभागात जी खनिज संपत्ती आहे ती शोधून त्याठिकाणी नवनवीन प्रकल्प उभारण्यास प्रोत्साहन दिले.तसेच कोल्हापूरचे बॉक्साईट बेळगांव च्या अल्युमिनियम कारखान्यास पुरवून तो कारखाना उभारणीत मा.बापूंनी अतिशय सुक्ष्मपणे अभ्यासकरुन महत्वपूर्ण निर्णय घेतला.तसेच महाराष्ट्र इन्डस्ट्रियल डेव्हलपमेन्ट कार्पोरेशनची स्थापना केली,कापड गिरण्यांना प्रोत्साहन दिले व औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्यांना पाठींबा दिला.तसेच सोलापूरला औद्योगिक क्षेत्र म्हणून महत्वपूर्ण स्थान दिले.महाराष्ट्र स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेन्ट कार्पोरेशनची स्थापना केली. तसेच यवतमाळ येथे चुनखडीचा कारखाना उभारला,बल्लारशा येथे कागद कारखाना उभारणीत महत्वाचा वाटा उचलला. त्याच बरोबर महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक विकास व अनुषंगिक समस्या विचारात घेण्याच्या प्रस्तावात सहभाग घेतला,तसेच साखर कारखान्यांची मोठ्या प्रमाणात भरभराट घडवून आणली व महाराष्ट्रामध्ये उद्योगधंद्याची व रोजगारीची वाढ होण्यासंबंधी उच्च अधिकाऱ्यांना अनेक सूचना देण्यात आल्या.

ग्रामीण भागातील लोकांना वीजेकरिता आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद केली.यासाठी राज्य विद्युत मंडळाच्या कामकाजावर चर्चा घडवून आणली व सर्व जिल्ह्यामध्ये विजेचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी एक योजना तयार केली व उद्योगधंद्यापेक्षा शेतीला जास्तीत जास्त वीज पुरवठा करण्याचे धोरण आखले.तसेच ग्रामीण विभागातील ग्राहकांना दर महिन्याला वीज मंडळाच्या वीज आकारणी केन्द्रामध्ये पैसे भरणे अडचणीचे होते म्हणून मा.बापूंनी वीजेची बिले सहामाही वसूल करण्याचा निर्णय घेतला.या देखिल निर्णयाचे महाराष्ट्रभर स्वागत करण्यात आले.असे अनेक महत्वाचे निर्णय मा.राजारामबापू पाटील यांनी उद्योग व वीज मंत्री असताना घेतलेले होते.त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना सन १९७२ च्या विधान सभेच्या निवडणुकीमध्ये कॉंग्रेस पक्षाचे वाळवा तालुक्यातील अधिकृत उमेदवार म्हणून तिकिट देण्यात आले.या निवडणुकीमध्ये मा.बापू तिसऱ्यांदा विक्रमी मताने निवडून आले. परंतु काही कारणामुळे त्यांना पक्ष श्रेष्ठींनी मंत्रिपद नाकारले. मा. बापूंनी सत्तेची अभिलाषा नव्हती.

बापू पाटील यांना सन १९६२ च्या विधानसभेच्या निवडणुकीचे तिकिट देऊन महाराष्ट्र राज्याची सेवा करण्याची संधी दिली. सन १९६२ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मा. राजारामबापू विक्रमी मताने निवडून आले. मा. बापूंना या काळात महाराष्ट्राचे उपमहसूल व वन मंत्री म्हणून घेण्यात आले. त्यानंतर सन १९६५ मध्ये मा. वसंतराव नाईक यांनी मा. बापूंना महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट दर्जाचे महसूल मंत्री म्हणून मंत्रीमंडळात घेतले. मा. बापूंनी महसूल मंत्री झाल्यानंतर ` खाते पुस्तिका ` जमीन मालकांच्या हाती देण्याचा शासकीय पातळीवरील अत्यंत महत्वाचा निर्णय घेतला. तसेच जमीन धारण करणारांचा झाडावरील हक्क, जमिनीवर राज्याचा अधिकार, शेत जमिनीवर महसूलाची आकारणी व जमाबंदी, शहर व गावठाण मोजणी, गावठाणातील घरांच्या जागावरील जमिन महसूल माफ, खाणी व खनिजे, शेतीसाठी दुस-यांच्या जागेत पाणी नेण्याचा हक्क, बांधावरुन जाण्याचा हक्क, शेतक-याच्या थकबाकीसाठी होणारी जमिनीची जप्ती, तीनशे लोकसंख्या असणा-या वाड्यांना गावाचा दर्जा, दुष्काळी व अन्न - पाण्याच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी सुधारणा असे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेऊन महाराष्ट्रातील शेतकरी व सर्वसामान्य लोकांचा विकास साधण्याचा प्रयत्न केला व सत्ता ही लोकांच्या कल्याणासाठी असते हे त्यांनी आपल्या प्रभावी कार्याने महाराष्ट्रीयन जनतेस दाखवून दिले. या कार्याचा मा. वसंतराव नाईक यांनी राजारामबापू पाटीलयांचा गौरव केला. महाराष्ट्रातील शेतक-यांनी तर राजारामबापू पाटील यांना आधुनिक काळातील ` राजा तोडरमल ` म्हणून गौरव केला. या मा. बापूंच्या भरीव कामगिरीमुळेच सन १९६७ च्या विधान सभेच्या निवडणुकीमध्ये दुस-यांदा प्रचंड मताधिक्याने निवडून आले.

सन १९६७ च्या विधान सभेच्या निवडणुकीत वाळवा मतदार संघातून निवडून आल्यानंतर त्यांना महाराष्ट्राचे वीज व उद्योग मंत्री म्हणून नियुक्त केले. याकाळात मा. राजारामबापू पाटील यांनी उद्योगधंद्याचा विकास घडवून आणला. वीज खेडोपाड्यापर्यंन्त कमी दरामध्ये पोहोचविली, वीज व उद्योग मंत्री असताना मा. बापूंनी तुर्भे येथील इलेक्ट्रॉनिक कारखाना सुरु करण्यासाठी जमिन, वीज व पाणी उपलब्ध करुन दिले. मराठवाड्यामध्ये औद्योगिक विकास महामंडळ स्थापन

सन १९७२ नंतर मा.बापू मंत्रिमंडळामध्ये नव्हते तरीही कॉंग्रेस पक्षाचा एक जागृत कर्तव्यदक्ष आमदार म्हणून त्यांनी आपली प्रतिमा उज्वल केली.याकाळामध्ये आमदार या नात्याने त्यांनी सभागृहाच्या विविध भागामध्ये उत्साहाने भाग घेतला.सत्ताधारी कॉंग्रेस पक्षामध्ये असताना मा.बापूंनी सन १९७३ मध्ये सुजगांव परिषद घेऊन शेतकऱ्यांचे जीवन सुजला सुफलां व्हावे म्हणून वारणा धरणातून पाटाचे पाणी मिळावे या मागणीसाठी एक लाख लोकांची विराट शेतकरी परिषद घेतली.मा.बापूंच्या राजकीय जीवनातील महत्वाची घटना आहे.त्याच बरोबर सन १९७५ मधील आणीबाणीतील भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या वीस कलमी कार्यक्रम त्यांनी सर्वांना समजावून सांगण्यासाठी वाळवा तालुक्यातील ९७ गावांची ६५० कि.मी.पदयात्रा केली होती.

सन १९७५ मध्ये मा.बापू २० कलमी कार्यक्रम जनतेपर्यन्त पोहोचविण्याचे कार्य करीत असताना त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.श्री.शंकरराव चव्हाण हे होते. व याचवेळी मुख्यमंत्री ना.शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्री पदावरुन बाजूला करुन मा.कै.वसंतदाद पाटील हे मुख्यमंत्री झाले.मा.श्री.शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्री होण्यासाठी श्रीमती इंदिरा गांधी यांनी पाठींबा दिला होता. परंतु त्यांना विश्वासात न घेता त्यांना पक्षातून काढून टाकण्याचे राजकारण शिजू लागले ही गोष्ट मा.बापूंना आवडली नसल्याने त्यांनी कॉंग्रेस पक्षाचा त्याग करुन लोकशाही कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. व जगजीवनराम बाबूंच्या नेतृत्वाखाली कार्यास सुरुवात केली.

मा.बापूंना एकदा कॉंग्रेस पक्ष सोडल्यानंतर त्यांनी कधीही कॉंग्रेसकडे वळून पाहिले नाही.या काळात त्यांनी जनतापक्षाचा प्रचार व प्रसार घडवून आणण्यात फार मोठा वाटा उचलला.लोकशाही कॉंग्रेसचे जनता पक्षात विलिनीकरण झाल्यानंतर मा.बापूंना जनता पक्षाच्या उपाध्यक्षपदी निवड केली.जनता पक्षातील त्यांचे कार्य अतिशय महत्वपूर्ण आहे. राष्ट्रीय चळवळीतील ध्येयवाद त्यांच्या मनामध्ये ठामपणे रुजला होता.त्या ध्येयवादामुळेच ते सतत सार्वजनिक कार्यामध्ये गुंतलेले असत म्हणून मा.बापूंना स्वयंप्रकाशी नेते असे म्हटले आहे.

मा.राजारामबापू यांनी जनता पक्षाची पाळेमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागापर्यन्त पोहोचविण्याचा प्रयत्न करीत असताना मा.बापू मुंबई महानगरपालिका मतदार संघातून विधान परिषदेवर निवडून आले ( १९७८) व त्यानंतर पुरोगामी लोकशाही दल मा.श्री.शरद पवार यांच्या मंत्रिमंडळात मा.बापूंना महाराष्ट्राचे ग्रामीण विकास विधि व न्यायखाते देण्यात आले. यावेळी मा.बापूंनी महाराष्ट्रातील अनेक लहान मोठ्या शहरातील व खेड्यांगावातील पाणी पुरवठा योजना आखल्या व त्या पूर्ण केल्या.तसेच मुंबई येथील लघुवाद न्यायालयातील प्रलंबित असलेली प्रकरणे निकालात काढली.त्याच प्रमाणे महाराष्ट्रामध्ये पुरेशा क्षमतेचे ट्रान्सफॉर्मस बसविण्याची तरतूद केली, पुणे येथे स्टेडियमची उभारणी केली,स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन मिळावी, तसेच महाराष्ट्र राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेचे उद्घाटन करुन राज्यस्तरापासून तालुका पातळीपर्यन्त कायदेविषयक सहाय्य व सल्ला देणाऱ्या समित्या स्थापन करणार असल्याचे सांगितले.तसेच महाराष्ट्रातील दैनिकांच्या संपादकांचा मेळावा घेतला, पुणे येथील ज्ञानप्रबोधिनी या संस्थेस भेट देऊन पाहणी केली,त्याच बरोबर महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषदेच्या अधिवेशनात सर्व तरुणांना प्रेरणा दिली. तसेच विदर्भातील पुरामुळे अतोनात नुकसान झाले होते त्यांना तेथे जाऊन दिलासा देण्याचे परम कार्य त्यांनी केले असी अनेक महत्वपूर्ण कार्य मा.बापूंनी ग्रामीण विकास विधि व न्यायमंत्री असताना केलेली होती.

पुढे सन १९८० नंतर पुरोगामी लोकशाही आघाडीचे मंत्रीमंडळ बरखास्त झाले.अर्थात त्यावेळी मा.बापू जनता पक्षाचे नेते होते.मंत्रीमंडळ बरखास्त झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र जनता पक्षाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली (१९८१) त्याठिकाणी ते सदैव प्रामाणिकपणे कार्य करीत राहिले.

मा.बापूं मंत्रीमंडळामध्ये असताना व मंत्रिमंडळात नसतानाही शिक्षण व सहकार या क्षेत्रातील महत्वपूर्ण कार्य करीतच राहिले. कासेगांव शिक्षण संस्थेची स्थापना करुन वाळवा तालुक्यातील गोरगरिब मुलां-मुलींना शिक्षण मिळवून दिले होते. वाळवा तालुक्यातील,कासेगांव,वाटेगांव,तांबवे,पेठ, बावची,कापूसखेड, बहे ,साखराळे इत्यादि वेगवेगळ्या ठिकाणी हायस्कूलची स्थापना केली होती.

त्याचप्रमाणे महाविद्यालयीन शिक्षणासाठी आष्टा येथे आर्टस ,कॉमर्स कॉलेजची निर्मिती केली होती.तसेच आधुनिक काळातील तांत्रिक ज्ञान आपल्या तालुक्यातील मुलांना मिळावे यासाठी मा.बापूंनी अभियांत्रिकी महाविद्यालय आणि तंत्रनिकेतन याची स्थापना करुन वाळवा तालुक्यामध्ये शिक्षणाचे जाळे पसरविले.

या शिक्षण कार्या बरोबर वाळवा तालुक्याच्या सर्वांगीण विकास व्हावा,बेरोजगारीला आळा बसावा यासाठी वाळवा सहकारी साखर कारखाना, वाळवा बॅन्क ,वाळवा सहकारी दूध संघ व वाळवा तालुका ग्राहक भांडार इत्यादि अनेक सहकारी तत्वावर चालणाऱ्या संस्था मा.बापूंनी निष्काम वृत्तीने उभ्या केल्या.

त्याच बरोबर सांगली जिल्ह्यातील जत कवठेमहंकाळ च्या माळावर मा.बापू यांनी पुढाकार घेतल्यामुळे महंकाली सहकारी साखर कारखाना उभा राहू शकला हे ही विसरुन चालणार नाही.

महाराष्ट्र विधान सभेतील त्यांची उपस्थिती सभासद मंत्री आणि सभाध्यक्ष या विविध नात्यांनी चिरस्मरणीय झाली आहे.

लोकनेत्यांनी फक्त वाळवा तालुक्यासाठी काही केले असे नाही तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी त्यांनी अनेक समाजोपयोगी कार्य केले आहे.

काही मान्यवरांच्या मुलाखती तसेच राजारामबापू यांच्या षाटयब्दी सोहळ्यांच्यावेळी त्याचप्रमाणे राजारामबापू पाटील यांची प्राणज्योत पंचत्वात विलीन झाल्यानंतर या महाराष्ट्राच्या थोर लोकनेत्याबद्दल प्रतिष्ठितांना व्यक्त केलेली आपली भावपूर्ण व्यक्त केलेली मते पुढीलप्रमाणे आहेत,त्यावरुन त्यांच्या कार्याचे मोठेपण आपणास दिसून येते --

राजारामबापू पाटील यांच्या निधनानंतर प्रतिष्ठितानी व्यक्त केलेल्या पुढील काही मोजक्या प्रतिक्रिया --

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व नेते श्री शरद पवार म्हणतात" सहकारी चळवळीचा आधार घेऊन,ऊसाला हिंदुस्थानात सर्वाधिक भाव देऊन आदर्श निर्माण करणाऱ्या राजारामबापूंच्या निधनाने पुरोगामी चळवळीला प्रचंड धक्का बसला आहे. शेतकरी दिंडित ४० किलोमीटरचा पायी प्रवास केल्यानंतरही न थकणारा उत्तम प्रकृतीचा त्यांच्यासारखा नेता अचानक निघून जाईल असे स्वप्नातही वाटले नव्हते.नव्या संक्रमणाची व परिवर्तनाची पहाट आपल्या सर्वांच्या नजरे समोर असताना व त्यानंतर होणाऱ्या सूर्योदयाची वाट पहात असतानाही बापू निघून गेले. आर्थिक,सामाजिक,परिवर्तनासाठी झटणाऱ्या आमच्या आघाडीचे ते लढवय्ये सरसेनापती होते. त्याच्या या लढयाची व स्वप्नांची पूर्ती करण्यासाठी आम्ही राज्यपातळीवर आणि राष्ट्रपातळीवर संघर्ष करू.[१]

जनता पक्षाचे नेते मा.जॉर्ज फर्नांडिस म्हणतात " महाराष्ट्रातील समग्र जनतेचा बापूच्याबद्दल फार मोठ्या अपेक्षा होत्या.त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या उभारणीचे काम होईल असा विश्वास आम्हास वाटत होता. पण दुर्दैवाने ते घडले नाही .आपण त्याचे कार्य पुढे चालवूया,त्यांच्या निधनाने एक त्यागी व तपस्वी नेता हरपला आहे.[२]

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व बापूंचे सहकारी वसंतरावदादा पाटील म्हणतात" महाराष्ट्राचे जनता पक्षाचे अध्यक्ष मा.राजारामबापू पाटील यांच्या आकस्मित निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक,राजकीय आणि सहकारि क्षेत्रातील एक महत्वपूर्ण व्यक्तिमत्वास काळाने आपल्या पासून हिरावून घेतले आहे. महाराष्ट्रातील सहकार,शिक्षण ,राजकारण आणि समाजकारण अशा विविध क्षेत्रात गेली अनेक वर्षे आम्ही एकत्रित काम केले.मध्यंतरीच्या काळात राजकीय मतभेद झाले,तरी आमच्या वैयक्तिक जीवनात कधीच दुरावा निर्माण झाला नाही. बापूंनी आपल्या कार्याचा ठसा आमदार,मंत्री,कॉंग्रेसपक्षाचे पदाधिकारी या नात्याने काम करीत असताना उमटविला ते कार्य दीर्घकाळ स्मरणात राहिल.[३]

भारताचे माजी पंतप्रधान व वयोवृध्द नेते मा.मोरारजीभाई देसाई आपल्या शोक संदेशात म्हणतात "महाराष्ट्राचे खंबीर नेतृत्व,आर्थिक,सामाजिक, संघटनेचा प्रणेता आज आपणास दु:खात लोटून अनंतात विलिन झाला.प्रकृतीची पर्वा न करता त्यांनी जनता पक्षाचे कार्य केले. बापूंच्या संपर्कात आलेल्या प्रत्येकांचे त्यांच्या निधनाने नुकसाण झाले आहे."[४]

जनता पक्षाचे नेते मा.सुब्रह्मण्यम स्वामी आपल्या शोक संदेशात म्हणतात "बापूसारखा ध्येयवान नेता महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात नाही"[५]

महाराष्ट्राचे नेते मा.सुधाकरराव नाईक आपल्या शोक संदेशात म्हणतात " राजारामबापूंच्या दु:खद निधनाने महाराष्ट्रातील एक प्रसन्न,प्रगल्भ आणि विचारी व्यक्तित्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.त्यांच्या निधनाने झालेली हानी भरुन येणे कठीण आहे. मी एका स्नेहाला मुकलो आहे."[६]

महाराष्ट्राचे नेते मा.आण्णासाहेब डांगे आपल्या शोक संदेशात म्हणतात" अर्धशतक समुद्रमंथन केल्यानंतर कै.राजारामबापूंच्या सारखी कामधेनू लाभली होती. क्रूर काळाने ती आपल्यातून हिरावून नेली आहे. बापू आता ईश्वररुप झाले आहेत. त्यांनी यापुढे ईश्वररुपाने आम्हा सर्व कार्यकर्त्यांना नवी प्रेरणा द्यावी."[७]

आज महाराष्ट्र हे भारतातील एक प्रागतिक राज्य आहे.महाराष्ट्राच्या आद्योगिक ,शेती व शैक्षणिक प्रगतीत मा.कै.राजारामबापू यांचा वाटा फार मोठा होता.अशा या लोकनेत्यास महाराष्ट्र कधीही विसरणार नाही.म्हणूनच राजारामबापू पाटील यांचे जीवन व कार्य हे पुढील पिढीस मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल हे निश्चितच.